## BOMBAY ACT No. VIII OF 1958.

## THE BOMBAY COMMISSIONERS OF DIVISIONS ACT, 1957.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची मंजुरी तारीख ८ माहे जानेवारी सन १९५८ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.

## BOMBAY ACT No. VIII OF 1958.

AN ACT TO PROVIDE FOR THE OFFICES OF COMMISSIONERS OF DIVISIONS IN THE STATE OF BOMBAY, FOR PRESCRIBING THEIR POWERS AND DUTIES AND TO MAKE PROVISIONS CONSEQUENT ON THE PROVISION FOR SUCH OFFICES AND FOR CERTAIN OTHER MATTERS.

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम ८ वा.

[राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख १० माहे जानेवारी सन १९५८ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

**मुंबई राज्यांत विभाग कमिशनरांच्या पदांची तरतूद करणें, त्यांचे अधिकार व कर्तव्यें विहित करणें आणि अशा पदांची तरतूद केल्यामुळें कराव्या लागणाऱ्या गोष्टींसाठीं व इतर विवक्षित बाबींसाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई राज्यांत विभाग कमिशनरांच्या पदांची तरतूद करणें, त्यांचे अधिकार व कर्तव्यें विहित करणें आणि अशा पदांची तरतूद केल्यामुळें कराव्या लागणाऱ्या गोष्टींसाठीं व इतर विवक्षित बाबींसाठीं तरतूद करणें आवश्यक आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या आठव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

लघु संज्ञा, व्याप्ति व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास मुंबई विभाग कमिशनर अधिनियम, १९५७ असें म्हणावें.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें नेमील अशा तारखेस अंमलांत येईल.

व्याख्या. २. या अधिनियमांत, संदर्भावरून इतर अर्थ होत नसेल तर,—

(अ) "कमिशनर" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाच्या अनुसूचीद्वारें सुधारलेल्या जमीन महसूलविषयक कायद्यान्वयें नेमलेला विभाग कमिशनर असा समजावा ;

(ब) "स्थानिक प्राधिकारी मंडळांचा संचालक" या संज्ञेचा अर्थ, स्थानिक प्राधिकारी मंडळाचा संचालक म्हणून राज्य सरकारनें तत्कालीं नेमणूक केलेला अधिकारी असा समजावा ;

(क) "विभाग" या संज्ञेचा अर्थ मुंबई जमीन महसूल कायदा, १८७९ या अन्वयें किंवा मुंबई राज्याच्या कच्छ व सौराष्ट्र प्रदेशास लागू असलेल्या त्या कायद्या-न्वयें किंवा मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ याअन्वयें किंवा हैदराबाद जमीन महसूल अधिनियम याअन्वयें विभागांत रचना केलेला प्रदेश असा समजावा ;

(ड) "विभाग अधिकारी" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, पुढील उपबंधांन्वयें विभाग अधिकारी म्हणून नेमलेला अधिकारी असा समजावा:—

(१) मुंबई जमीन महसूल कायदा, १८७९ याचें कलम ५ किंवा मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केलेलें त्या कायद्याचें तें (५वें) कलम,

(२) मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास लागू असलेलें त्या कायद्याचें कलम ५ आणि राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ याच्या १२२ व्या कलमान्वयें काढलेली तारीख १ नोव्हेंबर १९५६ रोजीची विधि विभागाची सरकारी अधिसूचना क्रमांक २५३९८/ब,

(३) मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ याचें कलम ९-अ आणि तारीख १ नोव्हेंबर १९५६ रोजीची महसूल विभागाची सरकारी अधिसूचना क्रमांक आर्. व्ही. ए. १५५६-आर्, किंवा

(४) हैदराबाद जमीन महसूल अधिनियमाचें कलम ४;

(ई) "अस्तित्वांत असलेला कायदा" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी राज्याच्या कोणत्याहि भागांत अंमलांत असलेला, संविधानाच्या सप्तम अनुसूचीतील सूचि २ व ३ यांत निर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधांत विधानमंडळानें किंवा इतर सक्षम प्राधिकारी मंडळानें केलेला कोणताहि कायदा असा समजावा व तींत, कायद्याप्रमाणें अंमल असलेला व अशा कोणत्याहि कायद्यान्वयें केलेला कोणताहि नियम, पोट-कायदा, विनियम किंवा लेख यांचा, दिलेल्या कोणत्याहि आदेशाचा काढलेल्या अधिसूचनेचा किंवा योजनेचा, किंवा विहित केलेल्या नमुन्याचा समावेश होतो;

(फ) "अनुसूचि" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूचि असा समजावा.

कायद्यांची सुधारणा; कोणत्याहि कायद्यान्वयें कमिशनरांना अधिकार देण्याचा किंवा त्यांजवर कर्तव्यें

३. (१) विभाग कमिशनरांच्या पदाची रचना करणें आणि कमिशनरांना अधिकार देणें व त्यांजवर कर्तव्यें लादणें या कारणांसाठीं व इतर विवक्षित कारणांसाठीं या अधि-नियमाच्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्यें निर्दिष्ट केलेले कायदे त्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्यें निर्दिष्ट केलेल्या रीतीनें व मर्यादेपर्यंत सुधारण्यांत येतील.

(२) उक्त अनुसूचीद्वारें सुधारल्याप्रमाणेंच्या जमीन महसुलासंबंधीं कायद्यान्वयें नेमलेल्या विभाग कमिशनरनें, उक्त अनुसूचीद्वारें सुधारल्याप्रमाणें पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेले कायदे धरून, त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्या-वरून कमिशनरला दिलेले अधिकार चालविले व लादलेलीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत.

(३) कमिशनरला दिलेले अधिकार बजावण्यावर किंवा त्याजवर सोंपविलेलीं लादण्याचा कर्तव्यें पार पाडण्यावर कोणत्याहि शर्ती किंवा निर्बंध लादण्यासाठीं किंवा यथास्थिति राज्य असे अधिकार व कर्तव्यें त्यांजकडून काढून घेण्यासाठीं अनुसूचींतील कोणतीहि नोंद, सरकारचा राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, सुधारण्याचा किंवा वगळण्याचा राज्य सरकारला अधिकार अधिकार. आहे, आणि त्यानुसार अनुसूचींत सुधारणा केली पाहिजे.

(४) राज्य सरकारास, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यानें कमिशनरला अधिकार देण्याचा व त्याजवर कर्तव्यें लादण्याचा अधिकार आहे ; आणि त्या कारणासाठीं, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें त्या कायद्यांत सुधारणा म्हणून केलेलीं आवश्यक अनुकूलनें व फेरफार अनुसूचींत जादा दाखल करण्याचा किंवा निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे ; आणि तसें केल्यावर—

(अ) असा प्रत्येक कायदा त्यानुसार सुधारण्यांत येईल आणि तो, अशा रीतीनें केलेलीं अनुकूलनें व फेरफार यांस अधीन राहून अंमलांत येईल, आणि

(ब) कायद्याची सुधारणा करणारा उक्त उपबंध या अधिनियमाच्या अनुसूचींत दाखल केल्यावर तिची सुधारणा करण्यांत आली आहे असें समजलें पाहिजे.

(५) राज्य सरकारास कोणत्याहि वेळीं तत्सम रीतीनें पोट-कलम (४) अन्वयेंची अधिसूचना रद्द करण्याचा अधिकार आहे व तसें केल्यावर संबंधित कायदा रद्द केलेल्या अधिसूचनेद्वारें सुधारण्यांत आला नसता तर ज्या स्थितींत असता त्याच स्थितींत असेल ; आणि अनुसूचीची त्यानुसार सुधारणा केली पाहिजे.

४. (१) हा अधिनियम अंमलांत आल्यावर मुंबई कमिशनर (पद रद्द करण्या-बाबत) अधिनियम, १९५० आणि मध्यप्रांत व वऱ्हाड कमिशनर (उल्लेखांचा अर्थ लावणें) अधिनियम, १९४८ हे रद्द होतील.

सन १९५०चा मुंबई अधिनियम २८वा आणि सन १९४८चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम ६१वा हे रद्द करणें.

(२) पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेले अधिनियम रद्द केल्यामुळें पुढील गोष्टींना बाध येणार नाहीं :—

(अ) राज्य सरकार किंवा (विभाग अधिकारी किंवा स्थानिक प्राधिकारी मंडळाचा संचालक खेरीज करून इतर) कोणताहि अधिकारी किंवा प्राधिकारी मंडळ ज्यांत पक्षकार असेल असें कोणतेंहि कायद्याचें कामकाज ; आणि असें कोणतेंहि कामकाज हें, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या उपबंधांस अधीन राहून, जणूं हा अधिनियम संमत झाला नसल्याप्रमाणें चालू ठेवलें व निकालांत काढलें पाहिजे ;

(ब) या अधिनियमाच्या उपबंधांवरून किंवा उपबंधांन्वयें कमिशनरला दिलेले अधिकार किंवा त्याजवर लादलेलीं कर्तव्यें खेरीज करून, जे कोणतेहि अधिकार किंवा जीं कोणतींहि कर्तव्यें, विभाग अधिकारी किंवा स्थानिक प्राधिकारी मंडळाचा संचालक खेरीज करून इतर कोणत्याहि अधिकाऱ्यास किंवा प्राधिकारी मंडळास देण्याचा किंवा त्याजवर लादण्याचा अधिकार ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी राज्य सरकारला होता किंवा जे अधिकार किंवा जीं कर्तव्यें बजावण्याचा किंवा पार पाडण्याचा राज्य सरकारला अधिकार होता असे कोणतेहि अधिकार किंवा कर्तव्यें ; किंवा

(क) कोणत्याहि अस्तित्वांत असलेल्या कायद्याच्या उपबंधांन्वयें किंवा त्यांच्या अनुरोधानें राज्य सरकारनें किंवा कोणत्याहि अधिकाऱ्यानें किंवा प्राधि-काऱ्यानें केलेली किंवा केली आहे असें समजली जाणारी कोणतीहि नेमणूक,

अधिसूचना, दिलेला किंवा दिला आहे असें समजला जाणारा कोणताहि आदेश, केलेली किंवा केला आहे असें समजला जाणारा कोणताहि नियम, विनियम, पोट-कायदा, विहित केलेला किंवा केला आहे असें समजला जाणारा कोणताहि नमुना, लिहून दिलेला किंवा लिहून दिला आहे असें समजला जाणारा कोणताहि लेख किंवा दस्तऐवज आणि अशी कोणतीहि नेमणूक, अधिसूचना, आदेश, नियम, विनियम, पोट-कायदा, नमुना, लेख किंवा दस्तऐवज हा, सक्षम प्राधिकाऱ्याकडून तो रद्द करण्यांत आल्याखेरीज व करण्यांत येईपर्यंत किंवा सुधारला गेल्याखेरीज व जाईपर्यंत कायदेशीर असेल व अंमलांत असेल.

अनिर्णित असलेलीं कायद्याचीं कामकाजें.

५. जर या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळीं, ज्या कामकाजांत विभागीय अधिकारी किंवा स्थानिक प्राधिकारी मंडळांचा संचालक पक्षकार आहे अशीं कोणतीहि कायदेशीर कामकाजें अनिर्णित असतील तर, उक्त कामकाजांत विभागीय अधिकारी किंवा स्थानिक प्राधिकारी मंडळांचा संचालक याऐवजीं कमिशनरची योजना केली पाहिजे.

अस्तित्वांत असलेल्या कायद्यांत विभागीय अधिकारी किंवा स्थानिक प्राधिकारी मंडळें यांच्या-संबंधींच्या उल्लेखांचा अर्थ.

६. अनुसूचींत केलेल्या उपबंधांस अधीन राहून, अस्तित्वांत असलेल्या सर्व कायद्यांचा संदर्भावरून अन्य रीतीनें अर्थ लावणें आवश्यक नसेल तर, त्यांतील, यथा-स्थिति, विभागीय अधिकारी किंवा स्थानिक प्राधिकारी मंडळें यांचा संचालक यांच्यासंबंधीं केलेले उल्लेख हे कमिशनरसंबंधींचे उल्लेख होते असें समजून, अर्थ लावला पाहिजे.

लेख किंवा दस्तऐवज यांतील उल्लेखांचा अर्थ.

७. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीं, अस्तित्वांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें किंवा त्याच्या अनुरोधानें किंवा अनुसूचींत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि अधिनियमान्वयें किंवा त्याच्या अनुरोधानें लिहून दिलेल्या किंवा केलेल्या सर्व लेखांचा किंवा दस्त-ऐवजांचा, संदर्भावरून अन्य रीतीनें अर्थ लावणें आवश्यक नसेल तर, त्यामध्यें विभागीय अधिकारी किंवा स्थानिक प्राधिकारी मंडळें यांचा संचालक यांच्यासंबंधीं केलेले उल्लेख हे कमिशनरसंबंधींचे उल्लेख होते असें समजून, अर्थ लावला पाहिजे.

विभागीय अधिकारी किंवा स्थानिक प्राधिकारी मंडळांचा संचालक वगैरेपुढें अनिर्णित राहिलेलीं कामकाजें.

८. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीं, अस्तित्वांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें राज्य सरकार किंवा विभागीय अधिकारी किंवा स्थानिक प्राधिकारी मंडळांचा संचालक किंवा कोणताहि इतर अधिकारी किंवा प्राधिकारी याजपुढें अनिर्णित राहिलेलीं अपिलाच्या, फेरतपासणीच्या किंवा पुनर्विलोकनाच्या स्वरूपांतील कामकाजें धरून सर्व कामकाजें हीं, अशीं कामकाजें निकालांत काढणें हें कमिशनरच्या अधिकारांच्या व कर्तव्यांच्या कक्षेंत येत असेल तेव्हां, कायद्यानुसार निकालांत काढण्याकरितां कमिशनरकडे वर्ग केलीं पाहिजेत.

अनुसूचि.

| १ | २ | |
|---|---|---|
| मुंबई जमीन महसूल कायदा, १८७९ (सन १८७९ चा मुंबई अधिनियम ५ वा). | १. कलमें ४, ५, ६ व ६-अ याऐवजीं पुढील कलमें दाखल करावीत :— | |
| | "४. जमीन महसुलाशीं संबंध असलेल्या सर्व बाबींतील मुख्य नियंत्रक प्राधिकार हा, राज्य सरकारास अधीन राहून, कमिशनरकडे निहित असेल. | महसुलाच्या बाबींत मुख्य नियंत्रक प्राधिकार. |
| | ५. राज्य सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, हा अधिनियम लागू असलेल्या ज्या प्रदेशांचा विभाग बनेल ते प्रदेश निर्दिष्ट करण्याचा व तशाच अधिसूचनेद्वारें अशा रीतीनें बनविलेल्या विभागाच्या हद्दी बदलण्याचा अधिकार आहे. | विभाग बनविणें. |
| | ६. मुंबई विभाग कमिशनर अधिनियम, १९५७ अंमलांत आल्यावर, प्रत्येक विभागासाठीं एक कमिशनर असेल : | प्रत्येक विभागासाठीं कमिशनर. |
| | परंतु या कलमांतील कोणत्याहि मजकुरामुळें, दोन किंवा अधिक विभागांसाठीं कमिशनर म्हणून एकच अधिकारी नमण्यास प्रतिबंध होतो असें समजतां कामा नये. | |
| | ६-अ. (१) राज्य सरकारनें विभाग कमिशनर नेमले पाहिजेत. | कमिशनरांची नेमणूक; त्यांचे अधिकार व कर्तव्यें. |
| | (२) कमिशनरांनीं या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें कमिशनरला मिळालेले सर्व अधिकार चालविले पाहिजेत व त्याजवर लादलेलीं सर्व कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत आणि त्याशीं सुसंगत असेल तेथवर, राज्य सरकार वेळोवेळीं विहित करील असे, त्यांच्या संबंधित विभागांतील अपिलाचे व त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे इतर सर्व अधिकार चालविले पाहिजेत किंवा कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. | |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
| --- | --- |
| | (३) त्याचप्रमाणें कमिशनरांनीं, राज्य सरकारच्या नियंत्रणास व सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याचे उपबंध अंमलांत आणण्याच्याच कारणांसाठीं व त्याच्याशीं सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार त्यांस देईल असे अधिकार चालविले पाहिजेत व त्यांजवर लादील अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. |
| अधिक कमिशनर. | ६-ब. (१) राज्य सरकारला, त्यास इष्ट वाटेल त्याप्रमाणें एखाद्या विभागांत अधिक कमिशनर नेमण्याचा अधिकार आहे. या अधिनियमाच्या किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या उपबंधान्वयें अधिक कमिशनरनें, राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें याबाबतींत निर्दिष्ट करील असे, त्याच्या विभागांतील कमिशनरचे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. |
| | (२) पोट-कलम (१) अन्वयें नेमलेला अधिक कमिशनर हा, राज्य सरकार, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें, याबाबतींत निर्दिष्ट करील अशा बाबतींत असेल त्याव्यतिरिक्त कमिशनरच्या हाताखालीं असणार नाहीं. |
| साहाय्यक कमिशनर. | ६-क. राज्य सरकारला, कमिशनरास साहाय्य करण्यासाठीं इष्ट वाटतील इतके साहाय्यक कमिशनर नेमण्याचाहि अधिकार आहे. साहाय्यक कमिशनर हा कमिशनराच्या हाताखालीं असेल व त्यानें या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें एखाद्या विभागांत किंवा त्याच्या भागांत, कमिशनर, राज्य सरकारची आगाऊ परवानगी घेऊन, निदेश देईल असें कमिशनरचे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत.". |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
|---|---|
| | २. कलम ७ मध्यें, "प्रत्येक विभागाचे" या शब्दांपूर्वी "कमिशनरच्या नियंत्रणाखालील" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | ३. कलम ८ मध्यें, "कलेक्टर होईल व" या शब्दांनंतर "आपल्या विभागाच्या कमिशनराच्या हाताखालीं राहील व" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | ४. कलम ८-अ मध्यें, "नेमण्याचा अधिकार आहे." या शब्दांनंतर "अधिक कलेक्टर हा आपल्या विभागाच्या कमिशनराच्या हाताखालीं राहील." हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | ५. कलम १३ मध्यें, "राज्य सरकारच्या" या शब्दांनंतर "व कमिशनरच्या" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | ६. कलम १४ मध्यें, "कलेक्टर वेळोवेळीं" या शब्दांपूर्वी "कमिशनर किंवा" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | ७. कलम १७ मध्यें, "राज्य सरकारच्या" या शब्दांनंतर "आणि कमिशनरच्या" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | ८. कलम ३७-अ मध्यें, "राज्य सरकारास" या शब्दांऐवजीं "कमिशनरास" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | ९. कलमें ३९ व १५९ मध्यें, "राज्य सरकारच्या" व "राज्य सरकारची" या शब्दांऐवजीं अनुक्रमें "कमिशनरच्या" व "कमिशनरची" हे शब्द व कलम ८२ मध्यें, "राज्य सरकार" या शब्दांऐवजीं "कमिशनर" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | १०. कलम १५२ मध्यें,— (अ) "राज्य सरकारनें" या शब्दांऐवजीं "कमिशनरनें" हा शब्द दाखल करण्यांत यावा. (ब) "करावयाचा तो" या शब्दांनंतर "राज्य सरकारच्या मंजुरीनें," हे शब्द दाखल करण्यांत यावे. |

अनुसूचि—चालू.

| १ | | २ |
|---|---|---|
| | | ११. कलम १८३ मध्यें, "सरकारकडून" या शब्दाएवजीं "सरकारच्या आदेशान्वयें कमिशनरकडून" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | | १२. कलम २०४ मध्यें, "सर्व्हे कमिशनरानें कोणताहि" या शब्दांपूर्वी "कमिशनरनें किंवा" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| भाग 'ग' राज्यें (कायदे) अधिनियम, १९५० अन्वयें मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केल्याप्रमाणेंचा मुंबई जमीन महसूल कायदा, १८७९ (सन १८७९ चा मुंबई अधिनियम ५ वा). | | १. कलमें ४ व ५ यांऐवजीं पुढील कलमें दाखल करावींत :— |
| | महसुलाच्या बाबींत मुख्य नियंत्रक प्राधिकार. | "४. जमीन महसुलाशीं संबंधित असलेल्या सर्व बाबींतील मुख्य नियंत्रक प्राधिकार हा, राज्य सरकारास अधीन राहून, कमिशनरकडे निहित असेल. |
| | विभाग बनविणें. | ५. राज्य सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें हा अधिनियम लागू असलेल्या ज्या प्रदेशांचा विभाग बनेल ते प्रदेश निर्दिष्ट करण्याचा व तशाच अधिसूचनेद्वारें अशा रीतीनें बनविलेल्या विभागाच्या हद्दी बदलण्याचा अधिकार आहे. |
| | प्रत्येक विभागासाठीं कमिशनर. | ६. मुंबई विभाग कमिशनर अधिनियम, १९५७ अंमलांत आल्यावर प्रत्येक विभागासाठीं एक कमिशनर असेल :<br>परंतु या कलमांतील कोणत्याहि मजकुरामुळें दोन किंवा अधिक विभागासाठीं कमिशनर म्हणून एकच अधिकारी नेमण्यास प्रतिबंध होतो असें समजतां कामा नये. |
| | कमिशनरांची नेमणूक, त्यांचे अधिकार व कर्तव्यें. | ६-अ. (१) राज्य सरकारनें विभाग कमिशनर नेमले पाहिजेत.<br>(२) कमिशनरांनीं या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें कमिशनरला मिळालेले सर्व अधिकार चालविले |

अनुसूचि—चालू.

| १ | २ | |
|---|---|---|
| | पाहिजेत व त्याजवर लादलेलीं सर्व कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत आणि त्याशीं सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार वेळोवेळीं विहित करील असे त्यांच्या संबंधित विभागांतील अपिलाचे व त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचें इतर सर्व अधिकार चालविले पाहिजेत किंवा कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. | |
| | (३) त्याचप्रमाणें, कमिशनरांनीं राज्य सरकारच्या नियंत्रणास व सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याचे उपबंध अंमलांत आणण्याचे केवळ कारणासाठीं व त्याच्याशीं सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार त्यांस देईल असे अधिकार चालविले पाहिजेत व त्यांजवर लादील अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. | |
| | ६-ब. (१) राज्य सरकारला, त्यास इष्ट वाटेल त्याप्रमाणें एखाद्या विभागांत अधिक कमिशनर नेमण्याचा अधिकार आहे. अधिक कमिशनरनें या अधिनियमाच्या किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या उपबंधांन्वयें राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें याबाबतींत निर्दिष्ट करील असे, त्याच्या विभागांतील कमिशनरचे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. | अधिक कमिशनर. |
| | (२) पोट-कलम (१) अन्वयें नेमलेला अधिक कमिशनर हा, राज्य सरकार सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें, या बाबतींत निर्दिष्ट करील अशा बाबतींत असेल त्याव्यतिरिक्त कमिशनरच्या हाताखालीं असणार नाहीं. | |
| | ६-क. राज्य सरकारला, कमिशनरास सहाय्य करण्यासाठीं इष्ट वाटतील इतके साहाय्यक कमिशनर नेमण्याचाहि अधिकार आहे. साहाय्यक कमिशनर | साहाय्यक कमिशनर. |

अनसूचि—चालू.

| १ | २ |
|---|---|
| | हा, कमिशनरच्या हाताखालीं असेल व त्यानें या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यान्वयें एखाद्या विभागांत किंवा त्याच्या भागांत, कमिशनर, राज्य सरकारची आगाऊ परवानगी घेऊन निदेश देईल असे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत.". |
| | २. कलम ८ मध्यें, "राज्य सरकारच्या" या शब्दांऐवजीं "आपल्या विभागाच्या कमिशनरच्या" हे शब्द दाखल करण्यांत यावेत. |
| | ३. कलम १३ मध्यें, "राज्य सरकारच्या" या शब्दांनंतर "व कमिशनरच्या" हे शब्द दाखल करण्यांत यावेत. |
| | ४. कलम १४ मध्यें, "राज्य सरकार" या शब्दांऐवजीं "कमिशनर" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | ५. कलम १७ मध्यें, "राज्य सरकारच्या" या शब्दांनंतर "आणि कमिशनरच्या" हे शब्द दाखल करण्यांत यावेत. |
| | ६. कलम ३७-अ मध्यें, "राज्य सरकारास" या शब्दांऐवजीं "कमिशनरास" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | ७. कलमें ३९ व १५९ मध्यें, "राज्य सरकारच्या" व "राज्य सरकारची" या शब्दांऐवजीं "कमिशनरच्या" व "कमिशनरची" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | ८. कलम ४९ मध्यें "राज्य सरकारास" या शब्दांऐवजीं "कलेक्टरास" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
|---|---|
| | ९. कलम १५२ मध्यें,—<br>(अ) " राज्य सरकारनें " या शद्वां-ऐवजीं " कमिशनरनें " हा शद्व दाखल करावा ;<br>(ब) " जो खर्च वसूल करावयाचा तो " या शद्वांनंतर " राज्य सरकारच्या मंजुरीनें " हे शद्व दाखल करावे. |
| | १०. कलम १५४ मध्यें " सदरहू प्रकारच्या जप्त्या " या शद्वांनतर " कलेक्टर राज्य सरकारच्या आदेशा-न्वयें " हे शद्व दाखल करावे. |
| | ११. कलम १८३ मध्यें, " राज्य सरकारकडून " या शद्वांऐवजीं " राज्य सरकारच्या आदेशान्वयें कमिशनर-कडून " हे शद्व दाखल करावे. |
| | १२. कलम २०४ मध्यें जेथें जेथें " कलेक्टरनें " व " कलेक्टर " हे शद्व असतील तेथें तेथें त्यांऐवजीं अनुक्रमें " कमिशनरनें " व " कमिशनर " हे शद्व दाखल करावे. |
| सौराष्ट्र राज्य (केन्द्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८, अन्वयें मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास अनुकूल व लागू केलेला मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९. | १. कलमें ४, ५ व ६ ऐवजीं पुढील कलमें दाखल करावीत :—<br>" ४. जमीन महसुलाशीं संबंधित असलेल्या सर्व बाबींतील मुख्य नियंत्रक प्राधिकार हा, राज्य सरकारास अधीन राहून, कमिशनर-कडे निहित असेल. — महसुलाच्या बाबींत मुख्य नियंत्रक प्राधिकार.<br>५. राज्य सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें हा अधिनियम लागू असलेल्या ज्या प्रदेशांचा विभाग बनेल ते प्रदेश निर्दिष्ट करण्याचा व तशाच अधिसूचनेद्वारें अशा रीतीनें बनविलेल्या विभागाच्या हद्दी बदलण्याचा अधिकार आहे. — विभाग बनविणें. |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
|---|---|
| | प्रत्येक विभागासाठीं कमिशनर. — ६. मुंबई विभाग कमिशनर अधिनियम, १९५७ अंमलांत आल्यावर प्रत्येक विभागासाठीं एक कमिशनर असेल : |
| | परंतु या कलमांतील कोणत्याहि मजकुरामुळें, दोन किंवा अधिक विभागांसाठीं कमिशनर म्हणून एकच अधिकारी नेमण्यास प्रतिबंध होतो असें समजतां कामा नये. |
| | कमिशनरांची नेमणूक, त्याचे अधिकार व कर्तव्यें. — ६-अ. (१) राज्य सरकारनें विभाग कमिशनर नेमले पाहिजेत. |
| | (२) कमिशनरांनीं या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें कमिशनरला मिळालेले सर्व अधिकार चालविले पाहिजेत व त्याजवर लादलेलीं सर्व कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत आणि त्याशीं सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार वेळोवेळीं विहित करील असे त्यांच्या संबंधित विभागांतील अपिलाचे व त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे इतर सर्व अधिकार चालविले पाहिजेत किंवा कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. |
| | (३) त्याचप्रमाणें, कमिशनरांनीं राज्य सरकारच्या नियंत्रणास व सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याचे उपबंध अंमलांत आणण्याच्याच केवळ कारणासाठीं व त्याच्याशीं सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार त्यांस देईल असे अधिकार चालविले पाहिजेत व त्यांजवर लादील अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. |
| | अधिक कमिशनर. — ६-ब. (१) राज्य सरकारला, त्यास इष्ट वाटेल त्याप्रमाणें एखाद्या विभागांत अधिक कमिशनर नेमण्याचा |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
|---|---|
| | अधिकार आहे. अधिक कमिशनरनें या अधिनियमाच्या किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या उपबंधान्वयें राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें या बाबतींत निर्दिष्ट करील असें, त्याच्या विभागांतील कमिशनरचे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत.<br><br>(२) पोट-कलम (१)अन्वयें नेमलेला अधिक कमिशनर हा, राज्य सरकार, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें, या बाबतींत निर्दिष्ट करील अशा बाबतींत असेल त्याव्यतिरिक्त कमिशनरच्या हाताखालीं असणार नाहीं.<br><br>६-क. राज्य सरकारला, कमिशनरास साहाय्य करण्यासाठीं इष्ट वाटतील इतके साहाय्यक कमिशनर नेमण्याचाहि अधिकार आहे. साहाय्यक कमिशनर हा, कमिशनरच्या हाताखालीं असेल व त्यानें या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यान्वयें एखाद्या विभागांत किंवा त्याच्या भागांत, कमिशनर, राज्य सरकारची आगाऊ परवानगी घेऊन निदेश देईल असें अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत".<br><br>२. कलम ८ मध्यें "कमिशनरच्या" या शब्दापूर्वीं "त्याच्या विभागाच्या" हे शब्द दाखल करावे.<br><br>३. कलम ३७-अ मध्यें "मुंबई राज्याची मालमत्ता" या शब्द प्रयोगाव्यतिरिक्त "मुंबई सरकार" या शब्दाऐवजीं "कमिशनर" हा शब्द दाखल करावा.<br><br>४. कलम ४९ मध्यें "कमिशनरास" या शब्दाऐवजीं "कलेक्टरास" हा शब्द दाखल करावा. |

सहाय्यक कमिशनर.

अनुसूचि—चालू.

| १ | | २ |
|---|---|---|
| | | ५. कलम १५४ मध्यें "कमिशनर" या शब्दाऐवजीं "कलेक्टर" हा शब्द दाखल करावा. |
| | | ६. कलम २०३ मध्यें पोट-कलम (२) गाळण्यांत यावें. |
| हैदराबाद जमीन महसूल अधिनियम (सन १३१७ फसलीचा हैदराबाद कायदा क्रमांक ८). | | १. संबंध अधिनियमांत "विभागीय अधिकारी" या शब्दांऐवजीं "कमिशनर" हा शब्द दाखल करावा. |
| | | २. कलमें ३ व ४ यांऐवजीं पुढील कलमें दाखल करावींत :— |
| | महसुलाच्या बाबींत मुख्य नियंत्रक अधिकार. | "३. जमीन महसुलाशीं संबंधित असलेल्या सर्व बाबींतील मुख्य नियंत्रक प्राधिकार हा, राज्य सरकारास अधीन राहून, कमिशनरकडे निहित असेल. |
| | विभाग बनविणें. | ४. राज्य सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें मुंबई राज्याच्या संबंध हैदराबाद प्रदेशाचा किंवा त्याच्या कोणत्याहि भागाचा विभाग बनविण्याचा व तशाच अधिसूचनेद्वारें अशा रीतीनें बनविलेल्या विभागाच्या हद्दी बदलण्याचा अधिकार आहे. |
| | प्रत्येक विभागासाठीं कमिशनर. | "४-अ. मुंबई विभाग कमिशनर अधिनियम, १९५७ अंमलांत आल्यावर प्रत्येक विभागासाठीं एक कमिशनर असेल :<br>परंतु या कलमांतील कोणत्याहि मजकुरामुळें, दोन किंवा अधिक विभागांसाठीं कमिशनर म्हणून एकच अधिकारी नेमण्यास प्रतिबंध होतो असें समजतां कामा नये. |
| | कमिशनरांची नेमणूक, त्यांचे अधिकार व कर्तव्यें. | ४-ब. (१) राज्य सरकारनें विभाग कमिशनर नेमले पाहिजेत.<br>(२) कमिशनरांनीं या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें कमिशनरला मिळालेले सर्व अधिकार चालविले |

अनुसूचि—चालू.

| १ | २ | |
|---|---|---|
| | पाहिजेत व त्याजवर लादलेलीं सर्व कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत आणि त्याशीं सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार वेळोवेळीं विहित करील असे, त्यांच्या संबंधित विभागांतील अपिलाचे व त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे इतर सर्व अधिकार चालविले पाहिजेत किंवा कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. | |
| | (३) त्याचप्रमाणें, कमिशनरांनीं राज्य सरकारच्या नियंत्रणास व सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याचे उपबंध अंमलांत आणण्याच्याच केवळ कारणासाठीं व त्याच्याशीं सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार त्यांस देईल असे अधिकार चालविले पाहिजेत व त्यांजवर लादील अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. | |
| | ४-क. (१) राज्य सरकारला त्यांस इष्ट वाटेल त्याप्रमाणें एखाद्या विभागांत अधिक कमिशनर नेमण्याचा अधिकार आहे. | अधिक कमिशनर. |
| | या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या उपबंधान्वयें अधिक कमिशनरनें, राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें या बाबतींत निर्दिष्ट करील असे, त्याच्या विभागांतील कमिशनरचे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. | |
| | (२) पोट-कलम (१)अन्वयें नेमलेला अधिक कमिशनर हा, राज्य सरकार, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें, या बाबतींत निर्दिष्ट करील अशा बाबतींत असेल त्याव्यतिरिक्त कमिशनरच्या हाताखालीं असणार नाहीं. | |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
|---|---|
| | सहाय्यक कमिशनर. ४-ड. राज्य सरकारला, कमिशनरास साहाय्य करण्यासाठीं इष्ट वाटतील इतके साहाय्यक कमिशनर नेमण्याचाहि अधिकार आहे. साहाय्यक कमिशनर हा, कमिशनराच्या हाताखालीं असेल व त्यानें त्या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यान्वयें एखाद्या विभागांत किंवा त्याच्या भागांत, कमिशनर, राज्य सरकारची आगाऊ परवानगी घेऊन निदेश देईल असे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडली पाहिजेत.". |
| | ३. कलम ६ मध्यें, पुढील मजकूर शेवटीं जादा दाखल करण्यांत यावा:— |
| | "अधिक कलेक्टर कमिशनरच्या हाताखालीं असेल परंतु, राज्य सरकार सामान्य किंवा विशेष आदेशावरून या बाबतींत निर्दिष्ट करील अशा बाबींसंबंधीं असेल तें खेरीज करून, इतर बाबतींत कलेक्टरच्या अधीन असणार नाहीं.". |
| | ४. कलम ७ मध्यें, " किंवा विभागीय अधिकारी " हे शब्द गाळण्यांत यावेत. |
| | ५. कलम ६१, पोट-कलम (२) मध्यें "सरकार" या शब्दाऐवजीं "कमिशनर" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | ६. कलम १२३ मध्यें, " सरकार " या शब्दांऐवजीं " राज्य सरकारच्या मंजुरीनें कमिशनर " हे शब्द दाखल करण्यांत यावेत. |
| | ७. कलम १५८, पोट-कलमें (२) आणि (२-अ) यांऐवजीं पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :— |
| | "(२) मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ यांतील उपबंधांस अधीन, राहून कमिशनरनें किंवा सर्व्हे |

अनुसूचि—चालू.

| १ | २ | |
|---|---|---|
| | सेटलमेंटचा किंवा लँड रेकॉर्ड्सचा नाझिम यानें, दिलेल्या कोणत्याहि निर्णयावर किंवा आदेशावर, अशा अधिकाऱ्यानें दुसऱ्या किंवा तिसऱ्या अपिलावर दिलेल्या कोणत्याहि निर्णयाच्या किंवा आदेशाच्या बाबतींत असेल तें खेरीज करून, राज्य सरकारकडे अपील करतां येईल. ". | |
| मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ (सन १९५५चा मध्यप्रदेश अधिनियम २ रा). | १. सबंध अधिनियमांत, " डेप्युटी कमिशनर " या शद्बांऐवजीं " कलेक्टर " हा शद्ब दाखल करण्यांत यावा.<br>२. कलम २, पोट-कलम (१) मधील कंडिका (४) गाळण्यांत यावी.<br>३. कलम ९-अ गाळण्यांत यावें.<br>४. कलम १० मध्यें,—<br>(अ) " बंदोबस्त कमिशनर " या शद्बांपूर्वी " कमिशनर ; " हा शद्ब दाखल करण्यांत यावा ;<br>(ब) " सहाय्यक कमिशनर (प्रथम आणि द्वितीय श्रेणीचे) " या मजकुराऐवजीं पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :—<br>" असिस्टंट कलेक्टर ; डेप्युटी कलेक्टर ; ".<br>५. कलम ११ नंतर पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :— | |
| | " ११-अ. जमीन महसुलाशीं संबंधित असलेल्या सर्व बाबींतील मुख्य नियंत्रक प्राधिकार हा राज्य सरकारास अधीन राहून, कमिशनरकडे निहित असेल. | महसुलाच्या बाबींत मुख्य नियंत्रक प्राधिकार. |
| | ११-ब. राज्य सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, मुंबई राज्याच्या सबंध विदर्भ विभागाचा किंवा त्याच्या | विभाग बनविणे. |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
| --- | --- |
| | कोणत्याहि भागाचा विभाग बनविण्याचा व तशाच अधिसूचनेद्वारें अशा रीतीनें बनविलेल्या विभागाच्या हद्दी बदलण्याचा अधिकार आहे. |
| प्रत्येक विभागासाठीं कमिशनर. | ११-क. मुंबई विभाग कमिशनर अधिनियम, १९५७ अंमलांत आल्यावर प्रत्येक विभागासाठीं एक कमिशनर असेल : <br> परंतु, या कलमांतील कोणत्याहि मजकुरांमुळें, दोन किंवा अधिक विभागांसाठीं कमिशनर म्हणून एकच अधिकारी नेमण्यास प्रतिबंध होतो असें समजतां कामा नये. |
| कमिशनरांची नेमणूक, त्यांचे अधिकार व कर्तव्यें. | ११-ड. (१) राज्य सरकारनें विभाग कमिशनर नेमला पाहिजे. <br> (२) कमिशनरांनीं या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें कमिशनराला मिळालेले सर्व अधिकार चालविले पाहिजेत व त्यांजवर लादलेलीं सर्व कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत आणि त्याशीं सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार वेळोवेळीं विहित करील असे त्यांच्या संबंधित विभागांतील अपिलाचे व त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे इतर सर्व अधिकार चालविले पाहिजेत किंवा कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. <br> (३) त्याचप्रमाणें, कमिशनरांनीं राज्य सरकारच्या नियंत्रणास व सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याचे उपबंध अंमलांत आणण्याच्याच केवळ कारणासाठीं व त्याच्याशीं सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार त्यास देईल असे अधिकार चालविले पाहिजेत व त्यांजवर लादील अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. |

अनुसूचि—चालू.

| १ | २ | |
|---|---|---|
| | ११-इ. (१) राज्य सरकारला, त्यास इष्ट वाटेल त्याप्रमाणें एखाद्या विभागांत अधिक कमिशनर नेमण्याचा अधिकार आहे. अधिक कमिशनरनें या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या उपबंधान्वयें राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें या बाबतींत निर्दिष्ट करील असे, त्याच्या विभागांतील कमिशनरचे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडली पाहिजेत. | अधिक कमिशनर. |
| | (२) पोट-कलम (१) अन्वयें नेमलेला अधिक कमिशनर हा, राज्य सरकार सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें, या बाबींत निर्दिष्ट करील अशा बाबतींत असेल त्याव्यतिरिक्त कमिशनरच्या हाताखालीं असणार नाहीं. | |
| | ११-फ. राज्य सरकारला, कमिशनरास सहाय्य करण्यासाठीं इष्ट वाटतील इतके सहाय्यक कमिशनर नेमण्याचाहि अधिकार आहे. सहाय्यक कमिशनर हा, कमिशनरच्या अधीन असेल व त्यानें या अधिनियमान्वयें किंवा त्या वेळीं अंमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यान्वयें एखाद्या विभागांत किंवा त्यांच्या भागांत, कमिशनर, राज्य सरकारची आगाऊ परवानगी घेऊन निदेश देईल असे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत.". | सहाय्यक कमिशनर. |
| | ६. कलम १३ मध्यें, "डेप्युटी कमिशनरची नेमणूक केली पाहिजे" या शब्दांनंतर "व तो कमिशनरच्या हाताखालीं असेल," हे शब्द दाखल करावे. | |
| | ७. कलम १४ मधील पोट-कलम (३) नंतर पुढील नवीन पोट-कलम जादा दाखल करावें :— | |
| | "(४) पोट-कलम (१) अन्वयें नेमलेला अॅडिशनल कलेक्टर हा, राज्य सरकार | |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
| --- | --- |
| | या संबंधांत सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें निर्दिष्ट करील अशा बाबी खेरीज करून, कलेक्टरास अधीन असणार नाहीं. ". |
| | ८. कलम १५ मध्यें,— |
| | (अ) "पहिल्या व दुसऱ्या श्रेणीचे सहाय्यक कमिशनर" या शब्दांऐवजीं "असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर" हे शब्द दाखल करावे. |
| | (ब) समासांतील टीपेंतील "सहाय्यक कमिशनरांची" या शब्दांऐवजीं "ॲसिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टरांची" हे शब्द दाखल करावे. |
| | ९. कलम १८ मध्यें,— |
| | (१) पोट-कलम (१) मधील "प्रथम श्रेणीच्या सहाय्यक कमिशनरास" या शब्दांऐवजीं "ॲसिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टरास" हे शब्द दाखल करावे. |
| | (२) पोट-कलम (२) मधील "सदरहू सहाय्यक कमिशनरला" या शब्दांऐवजीं "सदरहू ॲसिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टरला" हे शब्द दाखल करावे. |
| | १०. कलम २० मध्यें, "सहाय्यक कमिशनर" या शब्दांऐवजीं "ॲसिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर" आणि "सहाय्यक कमिशनरास" या शब्दांऐवजीं "ॲसिस्टंट किंवा डेप्युटी कमिशनरास" हे शब्द दाखल करावे. |
| | ११. कलम २६ मध्यें, "डेप्युटी कमिशनर" हा शब्द ज्या दोन ठिकाणीं येतो तेथें तेथें त्याऐवजीं "कमिशनर, कलेक्टर" हे शब्द दाखल करावे. |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
|---|---|
| | १२. कलम ४१ मध्यें,— |
| | (१) पोट-कलम (१) मधील— |
| | (अ) "अन्य व्यवस्था केली असेल ती खेरीज करून" या शब्दांनंतर "आणि मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ यांतील उपबंधांस अधीन राहून" हा मजकूर दाखल करावा; |
| | (ब) कंडिका (इ) ऐवजीं पुढील नवीन कंडिका दाखल कराव्या :— |
| | "(इ) असा आदेश कलेक्टरचे अधिकार बजावणाऱ्या कलेक्टरानें दिला असेल तर—कमिशनरकडे; |
| | (इ-१) असा आदेश, तोडजोडीच्या मुदतींत बंदोबस्त अधिकाऱ्याचे अधिकार बजावणाऱ्या कलेक्टरनें दिला असेल तर—बंदोबस्त कमिशनरकडे ; |
| | (क) कंडिका (ग) मध्यें "मंडळाकडे" या शब्दाऐवजीं "राज्य सरकारकडे" हे शब्द दाखल करावे. |
| | (ड) कंडिका (ग) नंतर पुढील कंडिका दाखल करावी :— |
| | "(ह) असा आदेश कमिशनरनें दिलेला असेल तर—राज्य सरकारकडे ;". |
| | (२) पोट-कलम (३) मध्यें, "मंडळाकडे" या शब्दाऐवजीं, "कमिशनरकडे किंवा यथास्थिति पोट-कलम (१)च्या अनुक्रमें कंडिका (इ) व (इ-१) याअन्वयें बंदोबस्त कमिशनरकडे" हा मजकूर दाखल करावा. |
| | १३. कलम ४३, कंडिका (ब) मध्यें, "मंडळाकडे" या शब्दाऐवजीं "कमिशनरकडे किंवा राज्य सरकारकडे" हे शब्द दाखल करावे. |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
| --- | --- |
| | १४. कलम ४६ मध्यें "मंडळ" या शब्दाऐवजीं "राज्य सरकार, कमिशनर" हे शब्द दाखल करावे. आणि शेवटीं असलेलें स्पष्टीकरण गाळण्यांत यावें.<br>१५. कलम ४७, पोट-कलम (१) याच्या परंतुकांत "बंदोबस्त कमिशनर" हे शब्द गाळण्यांत यावेत आणि "मंडळाची" या शब्दाऐवजीं "कमिशनरची" हा शब्द दाखल करावा. |
| मुंबई नौतरण व अंतर्देशीय जलयान अधिनियम, १८६८ (सन १८६८ चा मुंबई अधिनियम २रा). | कलमें २, २-अ, ४, ५ व ६ यांत व त्यांच्या समासांतील टीपांत "राज्य सरकार" हे शब्द व त्यांत व्याकरणानुसार होणारे फरक यांऐवजीं "कमिशनर" हा शब्द व त्यांत व्याकरणानुसार अनुक्रमें होणारे फरक दाखल करावे. |
| मुंबई वंशपरंपरागत पदांबाबत अधिनियम, १८७४ (सन १८७४ चा मुंबई अधिनियम ३ रा). | १. कलम ५, पोट-कलम (१) मध्यें "राज्य सरकारच्या" या शब्दांनंतर "किंवा तीस वर्षांपेक्षां अधिक मुदतीचें नाहीं असें गहाण, बोजा, अन्यसंक्रामण किंवा पट्टा याच्या बाबतींत कमिशनरच्या" हा मजकूर दाखल करावा.<br>२. कलम ६ मध्यें,—<br>(१) "राज्य सरकारास" या शब्दांऐवजीं "कमिशनरास" हा शब्द दाखल करावा व "राज्य सरकारनें" या शब्दांऐवजीं "उक्त कमिशनरनें" हे शब्द दाखल करावे.<br>(२) ही सुधारणा मराठींत करण्याची आवश्यकता नाहीं.<br>३. कलम ४५ मध्यें,—<br>(१) कंडिका (फ) मध्यें "राज्य सरकारास" याऐवजीं "कमिशनरास" हा शब्द दाखल करावा आणि कंडिका (ह) मध्यें "राज्य सरकारनें" या शब्दांऐवजीं "कमिशनरनें" हा शब्द दाखल करावा<br>(२) ही सुधारणा मराठींत करण्याची आवश्यकता नाहीं. |

अनुसूचि—चालू.

| १ | २ |
|---|---|
| | ४. कलम ७४ मध्यें, " राज्य सरकारच्या " या शब्दांऐवजीं " कमिशनरच्या व राज्य सरकारच्या " हे शब्द दाखल करावे. |
| | ५. कलम ७७ मध्यें, " राज्य सरकारकडे " या शब्दांऐवजीं " कमिशनरकडे " हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | ६. कलम ७९ मध्यें, पुढील परिच्छेद आणखी दाखल करण्यांत यावा :— " राज्य सरकारला या कलमान्वयच्या आपल्या अधिकारांपैकीं सर्व किंवा कोणतेहि अधिकार कोणत्याहि कमिशनराकडे सोंपविण्याचा अधिकार आहे आणि अशा कमिशनरनें त्यानंतर आपल्या अधिकारक्षेत्राच्या स्थानिक सीमांत या कलमान्वयेंच्या राज्य सरकारच्या फेरतपासणीविषयक अधिकारांस आणि राज्य सरकारला लादणें योग्य वाटेल त्या कोणत्याहि निर्बंधांस अधीन राहून असें अधिकार चालविले पाहिजेत.". |
